# प्रजासत्ताक दिन महाविद्यालयात उत्साहात साजरा




प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण करताना डॉ.के.एस.चौगुले सोबत एम.एस.चौगुले,शिवाजीराव पाटील,प्रकाश पाटील, सागर वरपे, डॉ. विजयकुमार पाटील, डॉ. बी. एन. रावण, डॉ. उषा पवार, गजानन शिंदे, सुरेश पाटील, टी. के. पाटील, प्रकाश भोसले,उर्मिला चौगुले व मान्यवर

श्रीपतराव चौगुले आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी- कोतोली येथे भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. के. एस. चौगुले यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव शिवाजीराव पाटील,खजिनदार एम. एस. चौगुले, संचालक प्रकाश पाटील, प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, आय. क्यु. ए. सी. समन्वयक डॉ. बी. एन. रावण, ज्युनिअर विभाग प्रमुख व सिनेट सदस्य डॉ. उषा पवार, एन.सी.सी.अधिकारी लेफ्टनंट डॉ. मनिषा सावंत, सी. डी. सी. सदस्य सागर वरपे, डी. एड. कॉलेजचे प्राचार्य गजानन शिंदे, आय. टी. आय. चे प्राचार्य सुरेश पाटील, माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका टी.के. पाटील, मुख्याध्यापक प्रकाश भोसले, मुख्याध्यापिका उर्मिला चौगुले, प्रा.संग्रामसिंह मोरे उपस्थित होते.

यावेळी एन.सी.सी. विभागामार्फत देशभक्तीपर गीत सादर करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत मानसिंग पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन संदिप वंजीरे यांनी केले.

कार्यक्रमास सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.